पा१५५

वार्ता टिपण दिनांक ०२/०७/२०१९

**अकरा वर्षांपासून पाहिजे असलेले आरोपीस खंडणी विरोधी पथकाकडून अटक.**

दिनांक ०२/०७/२०१९ रोजी खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र मोहिते यांचे दिमतीत त्यांचेकडील पो.हवा.११२५ काळभोर, पो.हवा.५६७९ कदम, पो.कॉ.७४४४ पिलाणे असे मुंढवा पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्रात प्रतिबंधात्मक पेट्रोलिंग करीत असताना, लोणकर चौक मुंढवा पुणे येथे आले असता, त्यांना विश्वासू बातमीदाराकडून बातमी मिळाली की, विश्रामबाग पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं.२०/२००८ भा.द.वि.कलम ३७९,३४ या गुन्हयातील गेले ११ वर्षांपासून पाहिजे असलेला आरोपी नामे गजानन अष्टेकर रा.सर्वोदय कॉलनी मुंढवा पुणे हा ताडीगुत्ता चौक मुंढवा येथील गणपती मंदिराचे बाजूला थांबला आहे त्याने अंगात लाल शर्ट व काळी पॅन्ट घातलेली आहे. अशी बातमी मिळाल्याने वरील कर्मचारी यांनी ताडीगुत्ता चौक मुंढवा येथे जावून खात्री केली असता तेथे गणपती मंदिराचे बाजूला वरील प्रमाणे इसम हा थांबलेला दिसल्याने त्यास ताब्यात घेवून नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव गजानन बाबुराव अष्टेकर वय-३५ वर्ष रा.सर्वोदय कॉलनी मुंढवा पुणे सध्या रा.केआरबी कंपनी समोर,गल्ली नं.३८, लडकत रोड, केशवनगर मुंढवा पुणे असे असल्याचे सांगितल्याने सदरचा इसम हाच वरील गुन्हयातील पाहिजे असलेला आरोपी असल्याची खात्री झाल्याने त्यास शिताफीने पकडून ताब्यात घेवून पुढील कारवाईकामी विश्रामबाग पोलीस स्टेशन यांचे ताब्यात दिले आहे.

**सदरची कामगिरी ही गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त मा.श्री.अशोक मोराळे सो., पोलीस उप आयुक्त श्री.शिरीष सरदेशपांडे सो.,सहा.पोलीस आयुक्त श्री.समीर शेख सो.यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते, पोलीस कर्मचारी उदय काळभोर, प्र शिंदे महेश कदम, अमोल पिलाणे यांनी केली आहे.**